वाचले-

१) आदेश क्र.मभां/४/कावि/९१३/२००८ दि.२२/०७/२००८

२) आदेश क्र.मभां/१०/३७७/२०११ दि.१५/१०/२०११

३) मे.अक्षय ग्रीन एनर्जी यांचा नोंदणी क्र.मभां/ईनोंक्र.५०३/२०१४ दि.०३/१२/२०१४ अन्वये नोंदणी

४)मे.साई सेवा एंटरप्रायजेस यांचा नोंदणी क्र. मभां/ईनोंक्र.६००/२०१६ दि.२४/०५/२०१६ अन्वये नोंदणी

५) मभां/७/कावि/७२५/२०१६ दि.१९/०९/२०१६ अन्वये मे.अक्षय ग्रीन एनर्जी यांना नोटीस

६) मभां/७/कावि/७२६/२०१६ दि.१९/०९/२०१६ अन्वये मे.साईसेवा एंटरप्रायजेस यांना नोटीस

७) मे.अक्षय ग्रीन एनर्जी यांचा अड. शेख एच वाय यांचे वतीने दि.०४/१०/२०१६ रोजीचाखुलासा

८)मे.साई सेवा एंटरप्रायजेस यांचा दि.२६/०९/२०१६ रोजीचा खुलासा

९) मा.आयुक्त यांचेकडील दि.१९/१२/२०१६ चा मंजुर प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८, मध्यवर्ती भांडार विभाग
मभां/७/कावि/२८४/२०१७
दिनांक-१६/०३/२०१७

विषय- आषाढी एकादशी पालखी सोहळा २०१६ साठी मुर्ती खरेदी प्रकरणी निविदाकारांना ठेकेदार नोंदणी यादीतून काढून टाकणेबाबत..

आदेश,

उपरोक्त वाचले क्र.१ व २ आदेशान्वये मे.अक्षय ग्रीन एनर्जी व मे.साई सेवा एंटरप्रायजेस यांची मनपाच्या भांडार विभागाकडे ई नोंदणीकृत ठेकेदार म्हणून वाचले क्र.३ व ४ अन्वये नोंदणी करणेत आलेली आहे. आषाढीवारी पालखी सोहळा २०१६ करीता संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज पालखीतील दिंडीप्रमुखांचा सत्कार करणेकामी विठ्ठल रूख्मीणी मुर्ती खरेदीकामी ई.नि.सु.क्र.९/२०१६-१७ प्रसिध्द केली असता केलेल्या निविदेत उक्त नोंदणीकृत ठेकेदार मे.अक्षय ग्रीन एनर्जी व मे.साई सेवा एंटरप्रायजेस यांनी निविदा भरलेली आहे. या निविदाधारकांनी निविदेतील अटी शर्तीप्रमाणे निविदेकरीता आवश्यक कागदपत्र सादर करणे बंधनकारक असताना अपुर्ण व दिशाभुल करणारी कागदपत्र सादर केलेली आहेत. त्यामुळे त्यांचेकडून वाचले क्र.५ व ६ अन्वये खुलासा मागविणेत आलेला असता तो उपरोक्त वाचले क्र.७ व ८ अन्वये प्राप्त झालेला आहे.

मे.अक्षय ग्रीन एनर्जी व मे.साई सेवा एंटरप्रायजेस यांनी सादर केलेल्या प्राप्त खुलाशाचे अवलोकन केले असता तो असमाधानकारक, अपुर्ण व दिशाभुल करणारा आहे.

सबब मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८ या आदेशान्वये मे.अक्षय ग्रीन एनर्जी व मे.साई सेवा एंटरप्रायजेस यांना ई निविदा क्र.९/२०१६-१७ मध्ये अपुर्ण व दिशाभुल करणारी कागदपत्रे सादर केलेली असल्याने, महाराष्ट्र शासन उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग -४ दि.०१/१२/२०१६ च्या नियम पुस्तीका प्रकरण-५ मधील ५.४ नुसार वाचले क्र.३ व ४ अन्वये करणेत आलेली नोंदणी आदेशाचे तारखेपासून १० वर्षाकरीता रद्द करण्यास मान्यता देत आहे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

प्रती,

१) मे.अक्षय ग्रीन एनर्जी कळसगाव विश्रांतवाडी पुणे

२) मे.साई सेवा एंटरप्रायजेस नेहरूनगर पिंपरी-१८

16/03/17

प्रत

संबंधीत विभाग प्रमुख